**गोपनीय/अतितात्काळ**

क्र. पोमसं/२/१०२०/निनिसु २०१५-१६/५०... 
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४००...
दिनांक : ०६/०१/२०१८

**संदर्भ :-** शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे- ०११६/प्र. क्र. १८९ (भाग-२) /पोल १ (अ), दिनांक ०६/०१/२०१८ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय:-** **पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नतीने पदस्थापना ...**

----ooo----

पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी ... नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या **श्री. धनाजी शिवाजीराव नलावडे, पोलीस निरीक्षक, बृहन्मुंबई** यांना **पोलीस उप अधीक्षक, जात पडताळणी समाजकल्याण विभाग, मुंबई उपनगर (प्रतिनियुक्तीने)** या पदावर पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश शासनाने कळविले आहेत.

२. तरी घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ)** उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास पाठवावा.

**आ)** पदोन्नती आदेशाधिन अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कृपया तात्काळ कार्यमुक्त करून, त्यांना कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख तातडीने या कार्यालयास कळवावी. तसेच, प्रस्तुत अधिका-यांविरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल, किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा प्रस्तुत अधिकारी निलंबित केले असल्यास त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची ... माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी. तसेच, ... अधिकाऱ्याविरुध्द विभागीय /संक्षिप्त/ प्राथमीक चौकशी/ न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबीत /प्रस्तावीत असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या, दि. ०२.०४.१९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार त्यांच्याविरुध्द प्रलंबीत/ प्रस्तावीत / संक्षिप्त/ प्राथमीक चौकशीअंति त्यांना शिक्षा झाल्यास, ... शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करावे. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी वेळीच हजर झाले नाही, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरूद्ध या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक

१६.०९.१९८३, ११.०१.१९८४ व १०.०२.१९९१, तसेच क्र. पोमसं /३/५५०७/६/९७, दिनांक १३.०२.१९९७ च्या परिपत्रकांतील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**इ)** उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची, व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राची प्रत कृपया सत्वर या कार्यालयास पाठवावी.

**ई)** संबंधीत कार्यक्षेत्रात निवडणूक आचारसंहिता चालू असेल तर निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर सदर अधिका-यास पदोन्नतीवरील नियुक्तीवर कार्यमुक्त करावे.

**उ)** ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सोबतच्या आदेशांन्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशांचा अवमान होणार नाही, याचीही दक्षता घेण्यात यावी.

**ऊ)** उपरोक्त अधिकाऱ्यास देण्यात आलेली पदोन्नती, मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र. २७९७/२००४, व याचिका क्र.२७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

**ए)** उपरोक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देताना, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई उपनगर (सस्नेह)

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई
( **लक्षवेध:- श्री. अ. अ. खोचरे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर

प्रत :-

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (सस्नेह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३, ९, ११, १४-अ, ३६ व ४०
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

<u>निवडसूची सन २०१५-१६.</u>
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-०११६/प्र.क्र.१८९ (भाग-२)/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ जानेवारी, २०१८.

<u>शासन आदेश</u> :-

पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या, सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील खालील अधिकाऱ्यास पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर (वेतनश्रेणी रु. १५,६००-३९,१००+ग्रेड पे ५४००/-) त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | नि:शस्त्र पोलीस निरीक्षक या पदावरील नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीनंतरचे नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. धनाजी शिवाजीराव नलावडे | बृहन्मुंबई | पोलीस उप अधीक्षक, जात पडताळणी समाजकल्याण विभाग, मुंबई उपनगर (प्रतिनियुक्तीने) |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांस विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, संबंधित अधिकारी, सदर शिक्षा पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरुन कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०१०६११३७०७७३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.01.06 11:40:03 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**उप सचिव, गृह विभाग.**

**प्रति,**

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

१. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,
८. संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. विभागीय समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई उपनगर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,
१२.निवडनस्ती पोल-१अ